# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date –20 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक २० डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

परभणीतल्या अप्रिय घटनेची, तसंच बीड जिल्ह्यात मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. विधानसभेत आज परभणी आणि बीड इथल्या घटनांबाबत झालेल्या अल्पकालीन चर्चेला ते उत्तर देत होते.

संविधानाचा अपमान करणाऱ्याची जात, धर्म, पंथ न पाहता कारवाई करण्यात येणार असून, या घटनेबद्दल अफवा पसरवून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचं, मुख्यमंत्री म्हणाले. परभणीमधल्या अप्रिय घटनेतला आरोपी हा मनोरुग्ण आहे, व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या आणि दगडफेक, जाळपोळ करणाऱ्या ५१ जणांना अटक करण्यात आली असून, या प्रकरणी अतिरिक्त बळाचा वापर करणाऱ्या पोलीस निरीक्षक अशोक घोडबांड यांना निलंबित करून त्यांची चौकशी केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. शांततेत आंदोलन सुरु असताना काही जण हिंसा पसरवण्याचा प्रयत्न करत असतील, तर सगळ्यांनी त्यावर आक्षेप घेतला पाहिजे, असं आवाहन फडणवीस यांनी केलं.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहभागी असलेल्या प्रत्येकावर कारवाई केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. या प्रकरणात बीडच्या पोलिस अधिक्षकांची बदली केली असल्याचं त्यांनी सांगितलं. बीड जिल्ह्यात वाळू माफिया, उद्योगांना त्रास देणाऱ्यांना मोहिम राबवून सर्वांवर संघटित गुन्ह्याअंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

अल्पकालीन चर्चेवर जितेंद्र आव्हाड यांनी राईट टू रिप्लाय अंतर्गत उत्तर मागितले असता अध्यक्षांनी ती नियमांतर्गत नाकारले यावर विरोधकांनी सभात्याग केला.

****

दरम्यान, विधानसभेत आलेल्या तीन स्थगन प्रस्तावाच्या सूचना अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी फेटाळल्या. मुंबईत काँग्रेसच्या कार्यालयावर झालेल्या हल्ल्याबाबत विजय वडेट्टीवार यांनी बोलण्याचा प्रयत्न केला असता त्यांना, सत्ताधारी बाकांवरून काँग्रेस विरोधी घोषणा देत विरोध केला. काँग्रेसचे नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार तसंच इतर सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो विधानसभेत बैठक स्थानावर लावले. नियमाप्रमाणे कुठल्याही नेत्याचे फोटो किंवा चित्र विधानसभेत झळकवण्यास अध्यक्षांनी मनाई केली, यावर दोन्ही बाकावरून बाबासाहेब आंबेडकर यांच्या समर्थनार्थ घोषणा देत गदारोळ निर्माण झाल्यानं, अध्यक्षांनी कामकाज दहा मिनिटांसाठी तहकूब केलं होतं.

****

हिंगोली जिल्हा बस आगाराला नविन बसेस उपलब्ध करुन द्याव्यात, हिंगोली मधल्या जिल्हा उपकेंद्रांना बळकट करुन सोयी सुविधा निर्माण कराव्या, रिक्त पदे भरावी, विस्कळीत झालेली आरोग्य सुविधा बळकट करावी आदी मागण्या आमदार प्रज्ञा सातव यांनी आज विधान परिषदेत केल्या.

तर मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी, राज्यातल्या शाळांना देण्यात येणाऱ्या टप्पा अनुदानाकरता ९२६ कोटी रुपयांची तरतूद करण्याची मागणी केली.

****

संसदेचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं. लोकसभेत आजही विरोधी पक्षांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध करत घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. खासदारांनी सभागृहाची मर्यादा राखावी आणि संसदेच्या गेटबाहेर आंदोलन करू नये, असं आवाहन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केलं. हा गदारोळ सुरुच राहील्यानं अध्यक्षांनी कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केलं.

दरम्यान, एक राष्ट्र एक निवडणुकीशी संबंधित दोन विधेयकं लोकसभेनं संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठवली आहेत. आज लोकसभेत कामकाज सुरु झाल्यावर कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधान संशोधन विधेयक २०२४, आणि केंद्रशासित प्रदेश कायदा विधेयक २०२४ समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव सादर केला. ही समिती आपला अहवाल पुढच्या अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात सादर करेल.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी 'परीक्षा पे चर्चा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून दरवर्षी विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. या कार्यक्रमाचा आठवा भाग पुढील महिन्यात सादर होणार आहे. या संवादात्मक कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू झाली असून, १४ जानेवारीपर्यंत MyGov पोर्टलवर नोंदणी करता येईल. परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी आणि विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना जीवन एक उत्सव म्हणून साजरे करण्यासाठी प्रोत्साहित करणं, ही या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

****

अखिल भारतीय साहित्य महामंडळ आणि सरहद, पुणेतर्फे दिल्ली इथं आयोजित करण्यात आलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या संकेतस्थळाचं उद्घाटन माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं. दिल्लीत सुमारे ७० वर्षांनंतर होत असलेल्या मराठी साहित्य संमेलनासाठी शुभेच्छा देऊन हे संमेलन अभूतपूर्व ठरेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

****

रायगड जिल्ह्यात ताम्हिणी घाटात आज सकाळी एका खाजगी बसच्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले. चालकाचा बसवरील ताबा सुटल्यानं हा अपघात झाला.  ही बस पुण्याहून महाड कडे लग्नाचं वऱ्हाड घेऊन जात होती. जखमींवर माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

****

जालना समाजकल्याण विभागातली महिला लिपीक सुलोचना साबळेला पाच हजार रुपयांची लाच घेताना काल पकडण्यात आलं. अॅट्रासिटीच्या गुन्ह्यातल्या तक्रारदारास मंजूर झालेल्या ७५ हजार रुपयांचं अनुदान खात्यावर वर्ग करण्यासाठी त्यांनी ही लाच मागितली होती.

****